Desktop/all document/letter

# मुंबई विद्यापीठ

## क्रमांक/संलग्नता/आयसीसी/२०१७–१८/2

संदर्भ:–शासनाचे पत्र क्र.संकिर्ण २०१६/प्र.क्र. ६३८/विशि–३
दिनांक ९ फेब्रुवारी, २०१७

**परिपत्रक:**

मुंबई विद्यापीठाच्या सर्व संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालयांचे प्राचार्य/संस्थांचे संचालक यांना सूचित करण्यात येते की, प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपरोक्त संदर्भांकित शासनाच्या पत्रान्वये यांच्या पत्र क्र. युएनआय/२०१७/विशि–१/२५५२ दिनांक १ मार्च, २०१७ अन्वये सर्व महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणा–या सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जांमध्ये "आपण मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदविले आहे काय?" या प्रकारच्या अतिरिक्त तपशिलाची विचारणा करण्याच्या मुद्दयाचा समावेश करण्यात यावा. असे निर्देश दिलेले आहेत (प्रत संलग्न).

उपरोक्त निर्देशाप्रमाणे आपण आपल्या महाविद्यालयाच्या/संस्थेच्या विद्यार्थी प्रवेश अर्जामध्ये "आपण मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदविले आहे काय?" या प्रकारचा एका अतिरिक्त तपशिलाच्या मुद्दयाचा समावेश करण्यात यावा व याबाबत विद्यापीठास अवगत करावे.

18/4/17

मुंबई–४०० ०३२
19 एप्रिल, २०१७

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/मान्यताप्राप्त सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/संस्थांचे संचालक यांना....

प्रत माहितीसाठी:–

१. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे–४११ ००१.
२. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण (मुंबई विभाग), ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई–४०० ००१.
३. मा. कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक.
४. मा. कुलसचिवांचे स्वीय सहाय्यक.
५. मा. संचालक, विद्याविषयक नियोजन
६. उपकुलसचिव, जनसंपर्क अधिकारी, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई–४०० ०३२.
७. निवड नस्ती, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई–४०० ०३२.

111४१

E
09/03/2017

Affiliation / Exam


**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय,(उच्च शिक्षण)**

**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,पुणे ४११००१**

**Web: www.dhepune.gov.in** **Mail Id: vishi.dhepune@.in**

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स०२०/२६१११११५३


क्र.- युएनआय / २०१७/विशि - १ / २५५२ दि. २८/२/२०१७

E 1 MAR 2017

UNIVERSITY ISACD/ECD/201 /- 06 MAR 2017 40489 MUMBAI

**प्रति,**

१ कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
२ सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,

**विषय -** विद्यार्थी प्रवेश अर्जामध्ये निवडणूक मतदार यादीमध्ये नाव नोंदविल्याबाबत माहिती समाविष्ट करणेबाबत.

**संदर्भ** - १. शासनाचे पत्र क्र सर्कीण २०१६/ प्र.क्र.६३८ /विशि-३ दि. ९/२/२०१७

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाकिंत शासन पत्राचे अवलोकन व्हावे. सोबत प्रत जोडली आहे.

आपल्या विद्यापीठाच्या प्रवेश अर्जामध्ये आपण मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदविले आहे काय? अशा प्रकारचा अतिरिक्त तपशील मागणीचा समावेश करुन आठ दिवसाच्या आत शासनास सुधारीत अर्जाचे नमूने सादर करण्याबाबत तसेच परदेशी व परराज्यातील विद्यार्थ्याबाबत निर्माण होणा-या अडचणी तपासून याबाबत व प्रत्येक विद्यार्थ्याला १८ वर्षे पूर्ण ज्या टप्प्यावर पुर्ण होतील तेव्हा मतदान नोंदणी अनिवार्य करण्याबाबत आपले अभिप्राय शासनास तात्काळ सादर करावेत व एक प्रत संचालनालयास सादर करण्यात यावी.

**(सुयश दुसाने)**
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य पुणे, - १

प्रत - १.मा. श्री.सतिश माळी, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०००३२

**महाराष्ट्र शासन**

क्र.संकीर्ण-२०१६/(प्र.क्र.६८३)/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०९/०२/२०१७.

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृष विद्यापीठे.

**विषय:-** विद्यार्थी प्रवेश अर्जामध्ये निवडणूक मतदार यादीमध्ये नाव नोंदविल्याबाबतची माहिती समाविष्ट करणेबाबत.

महोदय,

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व सर्व महाविद्यालयांमध्ये लाखो विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत. उच्च शिक्षणाच्या एका टप्प्यावर सर्व विद्यार्थी हे त्यांच्या वयाची १८ वर्ष पुर्ण करतात.

सदर तरुण मतदारांची अधिकाधिक नाव नोंदणी व्हावी यासाठी राज्य निवडणूक आयोग व राज्य शासनामार्फत नवनवीन उपक्रम हाती घेतले जात आहेत. याचाच एक भाग म्हणजे राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये व सर्व महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जामध्ये "आपण मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदविले आहे काय ?" या प्रकारचा एक अतिरिक्त तपशीलाची विचारणा करण्याच्या मुद्द्याचा समावेश करण्याचे विचाराधिन आहे.

सबब त्याअनुषंगाने आपल्या-आपल्या विद्यापीठाच्या प्रवेश अर्जामध्ये अशा प्रकारच्या अतिरिक्त तपशील मागणीचा समावेश करुन आठ दिवसाचे आत शासनास अर्जाचे सुधारित नमुने सादर करावेत. तथापी, परदेशी विद्यार्थी अथवा परराज्यातील विद्यार्थ्यांबाबत निर्माण होणारी अडचणदेखील तपासण्यात यावी. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला १८ वर्षे ज्या टप्प्यावर पुर्ण होतील, तेव्हा मतदार नोंदणी अनिवार्य करण्याबाबत आपले अभिप्राय सविस्तर तपशीलसह शासनास तात्काळ सादर करावेत, ही विनंती.

आपला,

(सतिश माळी)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

माहीतीस्तव-

१) मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक

प्रत:-

- आवश्यक कार्यवाहीस्तव :-

१) संचालक, उच्च शिक्षण पुणे,
२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
३) निवड नस्ती